# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक
# अंतःशुद्धीचे सोपान

## *उद्धरण ४*

भगवान कृष्णाने अर्जुनाला योगाची जी दुसरी व्याख्या सांगितली ती आहे, योगः कर्मसु कौशलम्, 'कर्मामध्ये कौशल्य योग आहे.' या श्लोकात, अर्जुनाला सांगितले गेले की, त्याने चांगल्या वा वाईट कर्मांना बळी न पडता योगाला समर्पित व्हावे.

बहुतेक लोक हे दाखविण्यासाठी मोठ्या आक्रमकतेने वागतात, की ते कसे बरोबर आहेत आणि इतर कसे चूक आहेत. त्यांना हे सिद्ध करायचे असते, की त्यांचा हेतू किती चांगला आहे आणि इतर सारे लोक कसे विनाशकारी किंवा स्वतःचीच सेवा करणारे आहेत. म्हणून, अशा लोकांच्या कर्मामध्ये शुद्धता नसते. ते कर्म, 'मी तुझ्याहून किती चांगला आहे' या मनोवृत्तीने दूषित झालेले असते. तुम्ही कधी अशा प्रकारे कर्म केले आहे का? मुळात ते कर्म बरोबर असो वा चूक, चांगले असो वा वाईट, सर्वसाधारणपणे पाहिले, तर लोक आपला वरचढपणा टिकविण्यासाठी आटापिटा करतात. यावरून काही आठवते का? जे लोक असे वागतात—आणि बहुतेक लोक असे वागतात—ते जंगलाच्या नियमानुसार जगत असतात. जो सर्वात शक्तिशाली असतो, तोच जिवंत राहतो. जो सर्वात मोठ्या आवाजात बोलतो, तोच जिंकतो. आणि म्हणूनच, कधीकधी त्यांची बरीचशी कर्मे शेवटी ठीक होत असतील, तरीही असे म्हणता येणार नाही, की ते योगामध्ये प्रतिष्ठित आहेत.

कर्मामध्ये कौशल्य योग आहे, लक्षात आहे? हे कौशल्य नेमके काय आहे? हे, आपल्या तुच्छ 'अहम्'ला आपल्या महान 'अहम्'पासून, आपल्या आत्म्यापासून वेगळे करण्याचे प्रज्ञान आहे. हे ते कौशल्य आहे, ज्याने तुम्ही स्वतःच्या प्रेरणेला स्पष्टपणे समजू शकता, ज्याने तुम्ही हे सांगू शकता, की तुम्ही जे कर्म करीत आहात, ते स्वतःची वाहवा करण्यासाठी करीत आहात, की ज्या जगात तुम्ही राहता त्याच्या हितासाठी करीत आहात. हे कौशल्य ती शक्ती आहे ज्यायोगे तुम्ही आपल्या स्वतःच्या अंधकाराशी संघर्ष करता आणि प्रकाशावर आपली दृष्टी टिकवून ठेवता. हे कौशल्य ती क्षमता आहे, ज्यायोगे तुम्ही प्रलोभनांना दूर ठेवता आणि सचोटीने काम करता.

अर्थातच, सगळ्या प्रकारचे अडथळे येतीलच. हा तर एक प्रकारे निसर्गाचा नियमच आहे—ज्या क्षणी तुम्ही निश्चय करता, की तुम्ही दररोज सकाळी लवकर उठून ध्यान कराल, त्या क्षणी लाखो आपत्कालीन परिस्थिती निर्माण होतात. तुम्ही जर योगामध्ये दृढ नसाल, तर तुम्ही, त्या परिस्थितींचे निवारण करून, काहीही झाले तरी आपल्या सर्वोच्च धर्माचे पालन करण्याच्या
खुबीचा, त्या सूक्ष्म क्षमतेचा विकास कधीही करू शकणार नाही. आध्यात्मिक अभ्यास करण्यासाठी

प्रचंड सामर्थ्य लागते. तुम्ही विचार केल्याप्रमाणे, नेहमीच सगळ्या गोष्टी होत नाहीत. खरे तर, जवळजवळ कधीच होत नसतात. म्हणून तुम्ही जागरूक राहिलेच पाहिजे. तुम्ही तुमच्या सत्कर्मांवर किंवा तुमच्या पूर्वजांकडून वंशपरंपरेने मिळालेल्या पुण्यांवर अवलंबून राहू शकत नाही. तुम्ही केवळ तुमच्या आत्म्यावर अवलंबून राहायला शिकले पाहिजे. याच कारणासाठी तुम्ही योगाचा अभ्यास करता.

एका उत्कृष्ट लेखकाने म्हटले आहे, "जर तुमचे जहाज तुमच्यापर्यंत आले नाही, तर तुम्ही पोहत त्याच्यापर्यंत जा." हे आहे योग कर्मांमध्ये उतरविणे. बहुतेक लोक असे करीत नाहीत. ते दोन कवडीचा सल्ला देतात आणि त्याच्या मोबदल्यात करोडो उपकारांची अपेक्षा करतात. ते दयाळूपणाचे एक कर्म करतात आणि मग विचार करतात की, संपूर्ण विश्व त्यांचे आभारी का नाही. हे आश्चर्यजनक नाही का, की लोक काय करतात आणि त्याच्या बदल्यात कशाची अपेक्षा करतात, लोक काय करीत नाहीत आणि त्याच्या बदल्यात कशाची अपेक्षा करतात? आपल्या जीवनाला स्वर्गमय बनविण्यासाठी कोणीही दीर्घ प्रयत्न करू इच्छित नाही; पण प्रत्येकाला असे मात्र वाटत असते, की इतर लोकांनी त्याच्यासाठी त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक करावे. "तू आला का नाहीस? मी तुझी किती वाट पाहिली! तू मला फोन का नाही केलास? तू माझ्या वाढदिवसाला मला पत्र का नाही लिहिलेस? का? तू हे का नाही केलेस? तू ते का नाही केलेस? तू माझ्याशी काहीतरी गोडगोड का बोलत नाहीस? सांग का बोलत नाहीस? तू माझ्यासाठी कधी एखादे गाणे का म्हणत नाहीस?"

या सगळ्या छानछान गोष्टी नेहमी इतर कोणीतरीच करायला हव्यात. काही इतर लोक, ज्यांना सर्वसाधारणपणे 'ते' असे म्हणले जाते. वास्तवात, ते जर इतके करीत आहेत, तर या साऱ्या महान सद्गुणांचा विकासदेखील 'त्यांनी'च केला पाहिजे. तुम्ही स्वतःला म्हणता की, शेवटी 'ते'च तर आहेत, ज्यांना या सद्गुणांची गरज आहे, नाही का?

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय ४ 'योगामध्ये दृढता,' यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. ४४-४६.